**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उल्हासराव यशवंतराव शिर्के
मु.पो.निरा, ता.पुरंदर, जि.पुणे-४१२१०२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था),
सहकार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था),
सहकार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९५६+१०७३+१११११+१११७+१११८+११११९+११६१+११६२+११६३+१४०५+१५३३+१५३३अ+१८९८/ पुणे<br>१९९८/पुणे (विशेष अपील निर्गत कार्यक्रमा व्यतिरिक्तचे अपील) |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत कार्यक्रम) | दि.२४.६.२००८ |

३. उपस्थित

अपीलकर्ता श्री.उल्हासराव यशवंतराव शिर्के
मु.पो.निरा, ता.पुरंदर, जि.पुणे-४१२१०२

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था),
सहकार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे श्री.मनोहर त्रिभुवन

**जन माहिती अधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था),
सहकार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे प्रतिनिधी श्री.जिनेंद्र देशपांडे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| ९५६ | ३०.३.२००७ | १९.४.२००७ | २५.५.२००७ | आदेश मिळाला नाही |
| १०७३ | १७.७.२००७ | ७.७.२००७ | ३०.६.२००७ | ५.१०.२००७ |
| ११११ | ५.४.२००७ | १.६.२००७ | ३०.६.२००७ | ५.१०.२००७ |
| १११७ | १५.६.२००७ | २९.६.२००७ | ६.८.२००७ | आदेश मिळाला नाही |
| १११८ | २५.६.२००७ | २०.७.२००७ | ६.८.२००७ | आदेश मिळाला नाही |
| १११९ | ३०.६.२००७ | २०.७.२००७ | ६.८.२००७ | आदेश मिळाला नाही |
| ११६१ | ३०.४.२००७ | २५.६.२००७ | २१.७.२००७ | आदेश मिळाला नाही |
| ११६२ | २५.५.२००७ | २५.६.२००७ | २१.७.२००७ | आदेश मिळाला नाही |
| ११६३ | २५.५.२००७ | १४.६.२००७ | २१.७.२००७ | आदेश मिळाला नाही |
| १४०५ | -- | -- | -- | १४.११.२००७ |
| १५३३ | ६.९.२००७ | ३.१०.२००७ | २०.१०.२००७ | आदेश मिळाला नाही |
| १५३३अ | ६.९.२००७ | ३.१०२००७ | २०.१०.२०७ | आदेश मिळाला नाही |
| १८९८ | २५.१.२००८ | आदेश मिळाला नाही | ४.३.२००८ | आदेश मिळाला नाही |
| १९९८ | १५.२.२००८ | ९.४.२००८ | २८.४.२००८ | आदेश मिळाला नाही |

४ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र.९५६**

निरा, ता.पुरंदर, जि. पुणे येथील समता नागरी सहकारी पतसंस्थेने संचयित केलेल्या इमारत निधीचे हिशेब, इमारतीसंबंधी अनुषंगिक अशी इत्यंभूत साद्यंत अशी मसग्र माहिती तपशीलवार- निधीबाबत-किती, संपला का, आणखी किती लागणार, निधीदात्याची संगतवार नावानिशी दिनांकासह रकमेबरोबर पावती क्रमांकाने द्यावी.

**अपील क्र.१०७३**

पतसंस्थामधील थकित कर्ज वसुलीसाठी सहाय्यक निबंधकाकडून देण्यात येत असलेल्या वसुली दाखल्यांच्या निकषासंबंधी: कर्जदार सभासद आहे किंवा कसे याची पडताळणी करण्याची पध्दत, थकबाकी अचुक असल्याची खातरजमा करण्याची पध्दत, कर्जदाराचे कर्ज मंजुरीपत्र व कर्जरोख्यात दिलेला तपशील याबाबत निबंधकांनी खात्री करुन तशा नोंदी ठेवण्याची पध्दत आहे काय, तसेच व्याजाची आकारणी केलेली व्याजाची पध्दत नियमानुसार आहे काय, दंडव्याज आकारणी व इतर नोटिस फी, रिकव्हरी चार्ज या बाबीवर हिशेबात मांडलेल्या रकमा योग्य असल्याबद्दल खातरजमा करण्याची व परीक्षण केल्याची नोंद ठेवण्याची पध्दत आहे काय, का नाही. संहितेतील निकषांची व पध्दतीची माहिती द्यावी.

**अपील क्र.११११**

पतसंस्थेसंबंधी गैरव्यवस्थापन व नियमबाह्य कार्यपध्दती याबाबत ऑगस्ट २००५ पासून केलेल्या तक्रारीबाबत सहायक निबंधक, पुरंदर यांनी सुनावणी घेतली, सुनावणीचा अहवाल व त्यावरील टिप्पणी.

**अपील क्र.१११७**

पतसंस्थेविरुध्द लेखी तक्रार रजिस्टर पोस्टाने केली होती. तसेच दिशादर्शनासाठी निवेदन दिले होते. त्यामध्ये केलेल्या चौकशीचा निर्णय अद्यापपर्यंत मिळाला नाही. निर्णय दिला का, केव्हा, नसल्यास विलंब का, तपासकामाचा जसा नोंदला असेल तसा तारीखवार तपशील मिळावा

**अपील क्र.१११८**

तक्रार अर्जाच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीची माहिती. कर्जातून ठेव, व्याज दर, व्याज आकारणी अशा सर्व मुद्दयांची सखोल खातेनिहाय चौकशीची शहानिशा पडताळणीने केली असल्याचा वृत्तांत

**अपील क्र.१११९**

तक्रारी अर्ज कुठल्या निकषांवर निकाली काढले ते मुद्देनिहाय निर्णायकी विश्लेषणाच्या साधार स्पष्टीकरणाने कळवावे.

**अपील क्र.११६१**

दि.२० ऑक्टोबर २००५ रोजी पतसंस्था कर्जाच्या कागदपत्रांबसोबत सही केलेले कोरे धनादेश घेण्याबाबत दि.३१ ऑक्टोबर २००५ रोजी पतसंस्था कर्जाच्या कागदपत्रासोबत सही केलेले कोरे स्टँप घेण्याबाबत दि.८.४.२००६ रोजी जामिनकी कर्जाबाबत अशा पत्राद्वारे काही सूचना, प्रस्ताव व पर्याय नमूद करुन त्याबाबत विचार विनिमय करुन साधकबाधक सांगोपांग चर्चेतून काही परिणामकारक उपाय कार्यान्वित करण्यासंदर्भात पत्रे पाठविली होती. याबाबत निष्कर्ष व त्याची काय अंमलबजावणी करणार.

**अपील क्र.११६२**

पतसंस्थांमधून होत असलेल्या आर्थिक उलाढालीच्या दैनंदिन कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहकार खात्याने नियंत्रित केलेली आचारसंहिता व तिच्या कार्यवाहीसाठी अनुसरण्यात येणारी पध्दती याची माहिती

**अपील क्र.११६३**

पतसंस्थेचे सभासदत्व मिळण्यासाठी दि.१९.१२.२००६ च्या अर्जाला संस्थेने सदस्यत्व नाकारल्यानंतर, दि.११.१.२००७ च्या पत्राने प्रतिक्रिया संस्थेसह निबंधक कार्यालय यांच्याकडे पाठविली होती. तसेच दि.२३.१.२००७ ला रितसर निबंधकांकडे अपील दाखल केले आहे. चार महिने पूर्ण झाले. सन १९८६ च्या महाराष्ट्र अधिनियम क्र.२० च्या सुधारणेनुसार अपील निबंधकांकडून तीन महिन्यात निकाली काढले जाईल व मुदतीत निकाली न काढल्यास निबंधक विलंबाची कारणे नमूद करतील. अपिलाची निर्णय परिणती व विलंबाची कारणे द्यावीत.

**अपील क्र.१४०५+१५३३**

सुनावणी अहवालातील शेऱ्यासंबंधीचे कारणासह स्पष्टीकरण

**अपील क्र.१५३३अ+१८९८**

दि.२५ मे , १५ जून, २५ जून २००७ रोजी अनामत रक्कम, व्याज आकारणी व इमारत निधी बाबत तक्रार अर्ज दिलेले आहेत. याखेरीज २५ जून २००७ ला बँकिंग लोकपाल, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई यांच्या कार्यालयाकडे दि.१०.४.२००७ रोजीच्या अर्जाला त्यांनी पाठविलेल्या उत्तराची प्रत मूळ अर्जासह जोडून कार्यालयात प्रत्यक्ष दाखल केली. त्या अनुषंगाने केलेल्या चौकशीचा व कार्यवाहीचा वृत्तांत.

जामीनदार हा शब्द कोठल्या अर्थाने सार्थ आहे त्याची निर्विवाद अर्थकृत समर्पकता स्पष्ट होणारी माहिती.

**अपील क्र.१९९८**

पतसंस्थेच्या बारामती येथील शाखेच्या इमारत खरेदीस दिलेली मंजुरी ही नेमक्या कोणत्या रकमेसबंधात दिली आहे, त्याच्या तपशीलासह मंजुरी पत्राची प्रत. त्यासंबंधात मंजुरी पत्राबाबतचा आदेश.

## विवेचन

'समता ग्रामीण बिगरशेती पतसंस्था मर्यादित, निरा' या पतसंस्थेच्या संदर्भात आपण केलेल्या विविध तक्रारींच्या अनुषंगाने गेल्या दोन वर्षांत केलेल्या कार्यवाहीची, तसेच अन्य काही माहिती अपीलकर्ता श्री. उल्हासराव यशवंतराव शिर्के यांनी जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था), सहकार आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री.शिर्के यांनी

अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर उपनिबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था), सहकार आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या निर्णयाबद्दल आक्षेप घेऊन अथवा त्यांनी दखलच न घेतल्याच्या कारणामुळे श्री.शिर्के यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकूण १४ अपिले केली आहेत. 'सहकारी पतसंस्थांच्या कामकाजात प्रचलित असलेल्या शब्दप्रयोगाच्या समर्पकतेची माहिती देऊन सहकार खात्यानेच यथार्थता विशद करुन द्यावी,' येथपासून 'आपण केलेल्या तक्रारींच्या संदर्भातील चौकशीचा व कार्यवाहीचा अहवाल, तसेच चौकशी किंवा कार्यवाही झाली नसल्यास त्याचे कारणासहित स्पष्टीकरण मिळावे,' अशा मागणीपर्यंत विविध प्रकारचे विषय श्री.शिर्के यांनी या अपिलांमध्ये मांडले आहेत.

समता पतसंस्थेकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करुन घेताना पतसंस्थेने जास्त रक्कम आपल्या मुलाकडून घेतली, अशी श्री.शिर्के यांची तक्रार आहे. त्याबाबत, तसेच या एकाच पतसंस्थेच्या संदर्भात माहितीच्या अधिकारात व अन्य प्रशासकीय स्वरुपाचे विविध अर्ज, अपिले व अन्य पत्रव्यवहार गेल्या दोन वर्षांपासून ते सातत्याने करीत आले आहेत. संस्थेत गैरव्यवहार व नियमबाह्य कार्यपध्दती असल्याचा त्यांचा आरोप असून त्याबद्दलच्या चौकशीची मागणीही ते करीत आले आहेत. 'आपण एकाच संस्थेबद्दल व एकाच विषयाशी निगडीत असे अर्ज केले असले तरी त्यांना विविध पैलू असल्याने व त्यांचे कंगोरे संवेदनक्षम असल्याने प्रत्येक पैलूवर स्वतंत्रपणे प्रश्नावलीच्या स्वरुपात विचार करुन त्यावर स्वतंत्रपणे अपिले दाखल केली आहेत,' असे श्री.शिर्के यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. गेल्या दोन वर्षांत सहकार आयुक्त कार्यालयाकडे आपण समता पतसंस्थेच्या संदर्भात विविध तक्रारी केलेल्या असूनही त्यावर कार्यवाही होत नाही, अशी तक्रार त्यांनी मांडली.

श्री.शिर्के यांनी केलेल्या तक्रारींवर आपल्या कार्यालयाने कार्यवाही केली आहे व त्यांच्या प्रत्येक अर्जावर त्यांना माहिती देण्यात आली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर निबंधक, सहकारी संस्था (पतसंस्था),सहकार आयुक्त कार्यालय श्री.मनोहर त्रिभुवन यांनी पूरक

कागदपत्रांसह लेखी व तोंडी नमूद केले. दि.२५ मे २००७ ते दि. २५.१.२००८ या कालावधीत श्री.शिर्के यांनी दाखल केलेल्या तेराही अपिलांच्या संदर्भात त्यांना वेळोवेळी माहिती देण्यात आलेली आहे. कायद्याच्या तपशिलाबाबत श्री.शिर्के अनेकदा माहिती मागतात. परंतु सहकार कायद्यातच तो नमूद असल्यामुळे व कायदा उपलब्ध असल्यामुळे त्यांना कलमे कळविण्यात आली नाहीत, असेही श्री.त्रिभुवन यांनी स्पष्ट केले.

श्री.शिर्के यांनी केलेले चौदावे अपील ( अपील क्र.१९९८) आधीच्या अपिलांमधील विषयाचीच पुनरावृत्ती करणारे आहे. उभय बाजूंच्या निवेदनांमधून व सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन त्याबद्दलची वस्तुस्थिती स्पष्ट होते.

श्री.शिर्के यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी वेळोवेळी दिली आहे. स्पष्टीकरण, कारणे या स्वरुपाची भाष्यात्मक अपेक्षा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये 'माहिती' म्हणून करता येणार नाही. तरीही जन माहिती अधिकाऱ्यांनी व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी तशा स्वरुपाचीही माहिती दिली आहे. श्री.शिर्के यांचे काही अर्ज आपल्या कार्यालयाला मिळाले नसल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर निबंधक श्री.त्रिभुवन यांनी सांगितले. मात्र या अर्जांची पोहोच श्री.शिर्के यांनी सादर केली. अशा अर्जांच्या प्रती दिल्यास पुढील कार्यवाही केली जाईल, असे श्री.शिर्के यांना आपण पूर्वीही कळविले होते, परंतु तशा प्रती त्यांनी दिल्या नाहीत. तसेच त्यांनी मागितलेल्या माहितीतील कोणताही तपशील द्यावयाचा राहिला असल्यास तो देण्याची तयारी आपण पूर्वीही दर्शविली होती व आताही त्याप्रमाणे पूर्तता केली जाईल, असे प्रतिपादन श्री.त्रिभुवन यांनी केले. स्वतः केलेल्या तक्रारींवर उपाययोजना सुचवून तशा कार्यवाहीची मागणी श्री.शिर्के करीत असतात, असेही त्यांनी नमूद केले. त्यानी सादर केलेल्या कागदपत्रांतून त्यांच्या निवेदनाला दुजोरा मिळतो.

वरील संदर्भ, उभय बाजूंची निवेदने व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करता जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक श्री.शैलेश कोथमिरे व अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर निबंधक श्री.मनोहर त्रिभुवन यांनी श्री.शिर्के यांना देय माहिती दिली असल्याचे दिसते.

तक्रारींवरील कार्यवाहीची श्री.शिर्के यांची मागणी हा स्वतंत्र व माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेबाहेरील विषय आहे.

पतसंस्थांवर सहकार खात्याचे नियंत्रण स्पष्ट करणाऱ्या कलमांची माहिती श्री.शिर्के यांनी मागितली आहे. सहकार कायद्यात ते स्पष्ट असले तरी कायद्यातील कलमांबाबतचे स्पष्ट उल्लेख करुन श्री.शिर्के यांना तशी माहिती देणे त्यांना उपयुक्त ठरेल.

एकाच संस्थेबाबत, एकाच स्वरुपाचे अनेक अर्ज व अपिले करणे हा सर्व यंत्रणांच्या व आयोगाच्या वेळेचा अपव्यय करणे आहे. तसा तो न करण्याची कडक समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले अमान्य.

(२) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार 'माहिती' या व्याख्येत बसणारा व अपीलकर्त्यास द्यावयाचा राहिलेला तपशील जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास निःशुल्क द्यावा.

(३) सहकार कायद्याचे पुस्तक अपीलकर्ता यांना द्यावे व सहकार खात्याच्या पतसंस्थांवरील नियंत्रणाबाबतची कलमे नमूद करणारे पत्र त्यासोबत द्यावे.

(४) संबंधित पतसंस्थेला संदर्भित इमारत खरेदीसाठी सहकार खात्याने किती रकमेला मंजुरी दिली आहे, याबाबतच्या मंजुरी पत्राची प्रत अथवा त्यासंबंधीची माहिती अपीलकर्त्यास द्यावी.

(५) वरील आदेशाची दहा दिवसात पूर्तता करुन आयोगाला तसा अहवाल अपिलीय प्राधिकारी यांनी सादर करावा.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.६.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १४.५.२००८ रोजी सांगली येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८ / सांगली | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शशिकांत नारायण वसगडेकर<br>अमित अपार्टमेंट, सांभारे रोड, गांवभाग, सांगली | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | कार्यालय अधीक्षक, आ-३, जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे | गैरहजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. शशिकांत नारायण वसगडेकर यांनी उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या रिट पिटीशन क्र. ९५६६/०४ बाबतची कागदपत्रे अवलोकन करू देण्याची व आवश्यक प्रतींची मागणी केली होती. विषय न्यायप्रविष्ट असल्यामुळे कागदपत्रे उपलब्ध करून देता येत नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, आ-३, जमाबंदी आयुक्त कार्यालय, पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक, भूमि अभिलेख सलंग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे यांनी कळविले, ते चूक आहे. कागदपत्रे उपलब्ध करून देणे वा अर्ज संबंधित जन माहिती अधिकारी / प्राधिकरण यांच्याकडे पाठविणे ही त्यांची जबाबदारी होती. सदर प्रकरणातील कागदपत्रे तपासण्यासाठी अपीलकर्त्यास देण्यात येतील व कागदपत्रांच्या प्रती मागणीप्रमाणे पुरविण्यात येतील, असे विशेष अपील निर्गत कार्यक्रमामधील निवेदनात अपिलीय प्राधिकारी तथा

उपसंचालक भूमि अभिलेख संलग्न, जमाबंदी आयुक्त (भूमापन ), पुणे श्री. ना.घ. साबळे यांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलार्थीस संचिका अवलोकन करण्यास उपलब्ध करून द्याव्या व त्यातील त्यांना आवश्यक त्या प्रती द्याव्या. या दोन्हीसाठी अपीलकर्त्यास कोणतेही शुल्क आकारू नये.

२. उप संचालक, भूमि अभिलेख सलंग्न जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. १०.७.२००८ पूर्वी आयोगास सादर करावा.

पुणे
दि. २६.६.२००८

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ